# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक : - १३ डिसेंबर २०२४

-----------------------------------------------------------------------------------------------------------------------------

जळगाव दि.१३ (प्रतिनीधी): कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्ष व स्कूल ऑफ कॉम्प्युटर सायन्सेस अंतर्गत एमसीए/एमएस्सी (कॉम्प्युटर व आयटी) ह्या विद्यार्थ्यांसाठी पँथर नेल्स,पुणे या कंपनीतर्फे घेण्यात आलेल्या परिसर मुलाखतीत ९ विद्यार्थ्यांची निवड झाली.

कंपनीतर्फे मुलाखत घेण्यासाठी सहसंस्थापक रुपेश तेलंग, स्मार्ट अॅ पचे संचालक पवन बारी, ग्राहक व्यवस्थापक रुपचंद जावळे, कोमल चौधरी व एचआर मॅनेजर श्वेता देसाई हे उपस्थित होते. स्कूल ऑफ कॉम्प्युटर सायन्सेस येथील ८८ विद्यार्थ्यांची लेखी परिक्षा व प्रात्यक्षिक परिक्षा घेण्यात आली होती.

प्रत्यक्ष मुलाखत घेऊन प्रियंका मराठे,शुभांगी महाजन,राधा तेली, पल्लवी निळे,अश्वीनी बोरले, नेहा पाटील,वैशाली पाटील,सचिन सरदार,शलाका भागवत यांची प्रशिक्षणार्थी म्हणून निवड करण्यात आली. मुलाखतीचे व्यवस्थापन प्लेसमेंट ऑफिसर सोनाली दायमा व प्रशाळेचे प्लेसमेंट समन्वयक डॉ. संदीप भामरे यांनी केले. या विद्यार्थ्यांचे कुलगुरु प्रा. व्ही.एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा.एस.टी.इंगळे, कुलसचिव डॉ.विनोद पाटील, प्रशाळेचे संचालक प्रा.राकेश रामटेके, कक्षाचे समन्वयक प्रा.रमेश सरदार व उपसमन्वयक डॉ.उज्वल पाटील यांनी अभिनंदन केले.

बातमी क्रमांक – २

जळगाव दि.१३ (प्रतिनीधी): कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या सामाजिकशास्त्र प्रशाळातील डॉ.आंबेडकर विचारधारा विभागाच्या वतीने यशवंतराव उर्फ भैय्यासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

विभागप्रमुख तथा संगणकशास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा.राकेश रामटेके यांचे आंबेडकरोत्तर चळवळीत भैय्यासाहेब आंबेडकर यांचे योगदान याविषयावर व्याख्यान झाले. भैय्यासाहेब आंबेडकर यांनी वृत्तपत्र, शिक्षण आणि धम्म चळवळीला गतीमान करण्यात मोठे योगदान दिल्याचे प्रा.रामटेके म्हणाले. डॉ.विजय घोरपडे यांनी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. तथागत सुरवाडे यांनी आभार मांडले. यावेळी प्रा.अभय मनसरे,डॉ.सुषमा तिनगोटे, प्रा.विनेश पावरा,प्रा.अतुल पाटील,प्रा.रोशन मावळे हे उपस्थित होते.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

डॉ.सुनील पाटील

जनसंपर्क अधिकारी